MHPA150013522024

**दिवाणी किरकोळ अर्ज क्र.२६२/२०२४**

**हाजी अजीज अलीखान खुर्रम अलीखान व**

**इतर विरुध्द निरंक**

**निशाणी क्र.०१ खालील आदेश**

अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज, मुंबई विनियमन (Regulation) अधिनियम, १८२७ च्या कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळण्याकरिता दाखल केलेला आहे.

०२. अर्जदारांचे अर्जातील कथन असे आहे की, मयत नामे खुर्रमअलीखॉ महमद अलीखॉ व फखरुनिस्सा बेगम खुर्रमअली खान हे अनुक्रमे दिनांक ०१/०३/२००६ व २८/०१/१९९९ रोजी सेलू, जि. परभणी येथे मयत झाले आहेत. अर्जदार क्र.१ हाजी अजीज अलीखान खुर्रम अलीखान हा मयताचा मुलगा व अर्जदार क्र.२ रईसा अफसर खातुन सय्यद मीर इसाख अली ही मयताची मुलगी आहे. इतर नातेवाईक क्र.१ मुकरमअली उर्फ अब्रार अलीखान खुर्रमअलीखॉ आणि इतर नातेवाईक क्र.२ रफीक अलीखॉ खुर्रमअलीखॉ हे मयतांची मयत मुले आहेत. मयताच्या पश्चात अर्जदारांशिवाय इतर कोणीही वारस नाहीत. अर्जदारांना मयताचे कायदेशीर वारस म्हणून ओळखण्यासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे अर्जदारांचा अर्ज मंजूर करुन वारस प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात देण्याची विनंती केली आहे.

०३. प्रस्तुत प्रकरणी, अर्जदारांच्या मागणी विषयी 'दैनीक देशोन्नती' या वर्तमानपत्रामध्ये दिनांक ०२/१२/२०२४ रोजी जाहीर प्रगटन प्रसिध्द करण्यात आले व अर्जदाराच्या मागणी बाबत कुणाला हरकत, आक्षेप असल्यास त्यांनी न्यायालयासमक्ष हजर होऊन नोंदवावा असे कळविण्यात आले. सदरचे जाहीर प्रगटनाच्या वर्तमानपत्राचा अंक दाखल आहे. परंतु, सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यानंतर सदर प्रकरणात शेर खान मुकरम अली खान यांनी हजर होऊन आक्षेप अर्ज दाखल करण्यासाठी वेळ मागणीचा अर्ज निशाणी १२ दाखल केला.

**०४.** अर्जदार क्र.१ यांनी अर्जातील कथनाच्या पुष्ठ्यार्थ निशाणी क्र.०९ वर शपथपत्र दाखल केले. तसेच, नि.क्र.१०, १६ व १७ वर मयत फकरुनिसा, मुकरमअली व खुर्रमअलीखॉ यांच्या मृत्युप्रमाणपत्राच्या पडताळणी केलेल्या प्रती, नि.क्र.१५ वर अर्जदार क्र.२ च्या आधारकार्डची पडताळणी केलेली प्रत, दाखल करून पुरावा बंद केल्याची पुरसीस नि.क्र.१८ दाखल केली आहे.

**०५.** अर्जदारांच्या वतीने श्री.एल.टी.मगर वकील यांनी युक्तीवाद केला की, मयत खुर्रमअलीखॉ महमद अलीखॉ व फखरुनिस्सा बेगम खुर्रमअली खान यांना अर्जदारांशिवाय इतर कोणीही वारस नाहीत. पुढे त्यांनी अर्ज मंजुर करुन वारसाप्रमाणपत्र मिळण्याची विनंती केली. अभिलेखावरील कागदपत्रांचे सूक्ष्मपणे अवलोकन केले.

**०६.** अर्जदाराचा अर्ज, अर्जदाराने अभिलेखावर दाखल केलेला कागदोपत्री पुरावा आणि त्याचे विधिज्ञांनी केलेला युक्तीवाद यांचा विचार करता खालील मुद्दे माझ्या विचारार्थ येतात, व त्यापुढील निष्कर्ष मी त्या खाली दिलेल्या करणांकरिता मांडत आहे.

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अर्जदार मागणी प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहेत काय? | होकारार्थी |
| २. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

**०७.** अर्जदारांना वारसाप्रमाणपत्राच्या आधारे मयताची मिळकत त्यांच्या हक्कात किंवा नावाने करून घेण्याचा अधिकार प्राप्त होत नाही. वारस प्रमाणपत्र मयाताच्या मिळकतीचे व्यवस्थापन करण्यासाठी उपयोगात घेता येते. माननीय मुंबई उच्च न्यायालयांने ***ॲलायसीस मॅनुअल डिसुझा व इतर विरूध्द मॅरी कमला विल्यम मॅनुअल डिसूझा, २००६***

***(मुंबई) सी.आर. ५६*** मध्ये मांडलेले निरीक्षण असे आहे की, वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी दाखल केलेल्या अर्जात न्यायालयाला मयताच्या मिळकतीवरील वारसांचा अधिकार ठरविण्याची गरज नसुन फक्त अर्जदार हे मयताचे वारस असल्याबाबत घोषीत करावे. अर्जदारांच्या नावे वारस प्रमाणपत्र वितरीत केले म्हणजे मयताच्या मिळकतीवर वारसांचा हक्क निर्माण होतो असा अर्थ होत नाही किंवा मयताच्या मिळकतीमध्ये एखाद्याचा अधिकार हिराऊन घेतल्या जात नाही.

०८. तसेच, माननीय उच्च न्यायालय मुंबई यांनी ***गणपती विनायक आचवल, २०१४(६), एमएच.एल.जे. ६८३*** मध्ये नोंदविलेले निरीक्षण असे की, वारस प्रमाणपत्र दिले म्हणजे अर्जदारांना मयताचे सर्वाधिकार प्राप्त होत नाहीत. वारस प्रमाणपत्र मंजुर झाले म्हणजे अर्जदार हे मयताचे केवळ प्रतिनिधीक वारस असल्याचे घोषीत होते. वारस प्रमाणपत्र मंजुरी हे केवळ वारसांची विद्यमान स्थिती असल्याचे औपचारीक घोषणा असते किंवा मृत्युपत्राचा व्यवस्थापक किंवा कायदेशीर प्रशासक हे न्यायालयाच्या आदेशा शिवाय मयताच्या मिळकतीचे व्यवस्थापन करू शकतात.

०९. असे असतांना एखादा व्यक्ती मुंबई विनियमन अधिनियम–VIII च्या नियमानुसार एखादा व्यक्ती पुढील परिस्थीतीमध्ये वारसाप्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहे–१.जर त्याची वारस प्रमाणपत्र मिळण्याची इच्छा असेल तर, २.जर वारस म्हणुन त्याच्या अधिकाराबाबत काही वाद असेल तर किंवा मयताच्या नावे असलेली मिळकत ज्या व्यक्तीच्या ताब्यात असेल त्या व्यक्तीला विश्वासात घेवुन मयताच्या मिळकतीचे व्यवस्थापन करावयाचे असल्यास वारस प्रमाणपत्राची मागणी करू शकतो. सदरील प्रकरणामध्ये अर्जदारांनी वारस प्रमाणपत्राची मागणी केली आहे.

१०. अर्जदार क्र.१ ने शपथपत्राद्वारे दिलेला पुरावा व दाखल केलेल्या कागदोपत्री पुराव्या वरुन, अर्जदार हे मयताचे वारस असल्याचे सिध्द होते. अर्जदार हे मयताचे वारस असल्याबद्दलच्या सदर प्रकरणात शेर खान मुकरम अली खान यांनी हजर होऊन आक्षेप

अर्ज दाखल करण्यासाठी वेळ मागणीचा अर्ज निशाणी १२ दाखल केला. तद्नंतर आक्षेपअर्ज सादर न केल्याने दिनांक २५/०९/२०२५ रोजीच्या निशाणी क्र.१ वरील आदेशानुसार सदरचा अर्ज आक्षेपाशिवाय पुढे चालवण्यात आला. त्यामुळे, अर्जदारांनी मागणी केल्याप्रमाणे अर्जदार मयताच्या नावे वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहेत. म्हणुन मी मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी नोंदवुन खालील आदेश पारीत करतो.

## आदेश

०१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

०२. अर्जदार क्र.१ व २ हे मयत खुर्रमअलीखॉ महमद अलीखॉ व फखरुनिस्सा बेगम खुर्रमअली खान यांचे कायदेशीर वारस आहेत असे नाममात्र घोषित करण्यात येते.

०३. मुंबई विनियमन (Regulation) अधिनियम, १८२७ च्या कलम ३ व ८ प्रमाणे अर्जदाराकडून विहीत न्यायालयीन शुल्क घेवून वारसा हक्क प्रमाणपत्र देण्यात यावे.

दिनांकः२७/०३/२०२६

**(विशाल आर. गटकळ)**
अति. सह. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
सेलू, जि. परभणी.